**महाराष्ट्र शासन**

**इतर मागास बहुजन कल्याण विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई**

**कार्यालय, व्यवस्थापकीय संचालक, महात्मा ज्योतिबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्था (महाज्योती), महाराष्ट्र राज्य, नागपूर**

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, 3 रा माळा, दिक्षाभूमी रोड, श्रध्दानंद पेठ, नागपूर** - 440 022

**दुरध्वनी क्रं.** 0712-2870120-21 CIN: U85300PN2019NPL187405 **ई मेल** - mahajyotingp@gmail.com

जा.क्र.महाज्योती/परीपत्रक/नागपूर/3545/2025-26 दिनांक:-26/12/2025

# -:परिपत्रक:-

**विषय:- भटक्या जमाती क - प्रवर्गातील धनगर समाजातील युवक- युवतींकरीता लष्करातील सैनिक भरती, महाराष्ट्र लोकसेवा आयोग (राज्यसेवा) व संघ लोकसेवा आयोग 2025-26 परीक्षा पुर्व प्रशिक्षणांकरीता करीता घेण्यात आलेल्या चाळणी परीक्षांची उत्तरपत्रिका** (Answer key) **महाज्योतीच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्याबाबत**.

महाज्योती मार्फत भटक्या जमाती क - प्रवर्गातील धनगर समाजातील विद्यार्थ्यांकरीता राबविण्यात येणाऱ्या संघ लोकसेवा आयोग, महाराष्ट्र लोकसेवा आयोग (राज्यसेवा) व लष्करातील सैनिक भरती परीक्षा पुर्व प्रशिक्षण 2025-26 करीता लाभार्थी विद्यार्थ्यांची निवड करण्याकरीता चाळणी परीक्षा महाराष्ट्र राज्यातील विविध जिल्ह्यातील परीक्षा केंद्रावर दि.06/12/2025 रोजी घेण्यात आलेली होती.

त्यानुसार सदर चाळणी परीक्षांची उत्तरपत्रिका दि.08/12/2025 रोजी महाज्योतीच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आलेली होती. तसेच सदर चाळणी परीक्षांच्या उत्तरपत्रिकेतील कोणत्याही प्रश्नांवर विद्यार्थ्यांना आक्षेप असल्यास त्याबाबतचे आक्षेप नोंदविण्याकरीता आक्षेप फलकाची लिंक दि.09/12/2025 रोजी पर्यंत उपलब्ध करुन देण्यात आलेली होती. त्यानुसार दि.09/12/2025 रोजी पर्यंत प्राप्त झालेल्या आक्षेपांचे निराकरण करुन सदर प्रशिक्षणांकरीता घेण्यात आलेल्या चाळणी परीक्षांची सुधारित उत्तरपत्रिका (Answer key) सदर परिपत्रकासोबत महाज्योतीच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात येत आहे.

(स्वा.)
(मिलिंद नारिंगे)
**व्यवस्थापकीय संचालक**
महात्मा ज्योतिबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्था
(महाज्योती), महाराष्ट्र राज्य, नागपूर.